# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

### मंगळवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२०/ फाल्गुन ६, १९४१ शके

**२४.** महाराष्ट्र विधानसभा नियम १०६ (३) प्रमाणे बॅलटव्दारे काढण्यात आलेल्या आणि शुक्रवार, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२० रोजी सभागृहात चर्चेसाठी घेण्यात येणाऱ्या अशासकीय ठरावांच्या सूचना देणा-या सदस्यांची क्रमवार सूची खालीलप्रमाणे आहे.

(१) **श्री. गणेश नाईक, वि.स.स. यांचा ठराव क्र. २१८**

" राज्यातील वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे विस्तापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे काम अद्यापही पूर्ण झालेले नसल्याने विस्थापितांचे होत असलेले हाल, त्यामुळे शासनाच्या विचाराधीन प्रकल्पांसाठी जमिनी देण्याच्या कामाला शेतकऱ्यांचा होत असलेला विरोध, त्याबाबत निर्माण केल्या जाणाऱ्या कायदेशीर अडचणी इ. बाबी विचारात घेता प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे रखडलेले काम तात्काळ पूर्ण करण्यासाठी कालबद्ध धडक कार्यक्रम राबविण्यात यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(२) **श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांचा ठराव क्र. ५५**

"मुंबईसह राज्यात रेल्वेचे सर्वाधिक जाळे पसरलेले असणे, सर्वाधिक महसूल प्राप्त होवूनही, केंद्राकडून पूरेशा प्रमाणात राज्यास निधी प्राप्त न होणे, महिला सुरक्षा, प्रलंबित योजना, रेल्वे समस्या, सुरक्षित प्रवास आणि प्रवाशांना अत्याधुनिक सेवा सुविधांकरीता, आवश्यक निधीची तरतूद करुन व्यवस्थापन करण्यासाठी महाराष्ट्र राज्याकरिता, 'स्वतंत्र महाराष्ट्र रेल महामंडळ' स्थापन करावे अशी आग्रही मागणी, राज्य शासनाने केंद्र शासनाकडे करावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे."

(३) **श्री. राणाजगजीतसिंह पाटील, वि.स.स. यांचा ठराव क्र. ६५**

"शेतीची नापिकी, अतिवृष्टी, जलप्रकोप, दुबार पेरणी, तिबार पेरणी, ओला व कोरडा दुष्काळ असा असूनही पीक विमा नुकसान भरपाई पासून आणेवारी व उंबरठा उत्पन्नाच्या जाचक निकषामुळे शेतकरी वंचित राहत असणे, याला शंभर वर्ष जुनी ब्रिटीशकालीन आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष कारणीभूत असल्याने त्यात बदल करुन सुधारित आणेवारी व उंबरठा काढण्याचे निकष तयार करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही भूमिका घ्यावी, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे. "

(४) **श्री. विकास कुंभारे, वि.स.स. यांचा ठराव क्र. २१०**

"अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला "संत गजानन महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला" असा नामविस्तार करण्याची राज्यातील जनतेची मागणी असल्यामुळे राज्य शासनाने या विद्यापीठाचा नामविस्तार करण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे. "

(५) **श्री. संजय केळकर, वि.स.स. यांचा ठराव क्र. १२६**

"राज्यात रस्ते अपघातात ताबडतोब व योग्य उपचार मिळत नसल्याने मृत्यू पावणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असणे, अपघातग्रस्तांना वेळीच योग्य उपचार मिळावेत म्हणून मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग, मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा (वडखळ नाका), नाशिक-शिर्डी, पुणे-कोल्हापूर, नाशिक-धुळे या सारख्या जास्त वाहनांची वर्दळ असलेल्या द्रुतगती मार्गावर शासनाने ट्रॉमा केअर सेंटर सुरु करावेत तसेच मुंबई-पुणे राष्ट्रीय मार्गावर चौक लोधिवली (ता.खालापूर, जि.रायगड) येथे अदययावत असलेल्या जे.एच.अंबानी हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय सेवा 24 तास देण्याची व्यवस्था करणे, अशी शिफारस ही विधानसभा शासनास करीत आहे. "

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२०

राजेन्द्र भागवत
सचिव (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा

**याची प्रत:**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व कक्ष.
३. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
४. संगणक कक्ष (website)